दिनांक २३.०३.२०२६.

**प्रेसनोट**

आरोपी लोकसेवक सलिम अब्दुल अहमद शेख, वय ४५ वर्ष, पद वरिष्ठ लिपीक (गट क) पुर्णा पाटबंधारे विभाग वसमत, जिल्हा हिंगोली रा. पिर बुरहान नगर, गल्ली नं. ८ नांदेड यांनी दिनांक २३.०३.२०२६ रोजी तक्रारदार यांचेकडे १,०००/- लाचेची पंचासमक्ष मागणी करून दिनांक २३.०३.२०२६ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक सलिम अब्दुल अहमद शेख यांनी १,०००/- रूपये लाचेची रक्कम स्वतः पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन वसमत (शहर), ता. वसमत, जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

---

पिडीत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, हिंगोली येथे दिनांक २३.०३.२०२६ रोजी हजर येवुन तक्रार दिली होती की, लोकसेवक सलिम शेख यांनी तक्रारदार यांचे थकित माहे जुलै, ऑगष्ट व सप्टेंबर २०२५ या तीन महिन्याचे पगार बिल तयार करून त्यावर उप कार्यकारी अभियंता (आस्थापना) यांची स्वाक्षरी घेवुन ते कोषागार विभागात जमा केले या कामाचा मोबदला म्हणुन लोकसेवक सलिम अब्दुल अहमद शेख, वय ४५ वर्ष, वरिष्ठ लिपीक (गट क) पुर्णा पाटबंधारे विभाग वसमत हे तक्रारदार यांचेकडे १,०००/- रूपये लाचेची लाचेची मागणी करीत आहे अशी तक्रार कार्यालयात प्राप्त झाली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २३.०३.२०२६ रोजी पंच साक्षीदार यांचे समक्ष लाच मागणी पडताळणी केली. लाच मागणी पडताळणी दरम्यान आलोसे सलिम अब्दुल अहमद शेख, वय ४५ वर्ष, पद वरिष्ठ लिपीक (गट क) पुर्णा पाटबंधारे विभाग वसमत यांनी तक्रारदार यांचे कामाचे संदर्भात बोलणी केली. त्या दरम्यान तक्रारदार यांचे थकीत माहे जुलै, ऑगष्ट व सप्टेंबर २०२५ या तीन महिन्याचे पगार बिल तयार करून, त्यावर उप कार्यकारी अभियंता (आस्थापना) यांची स्वाक्षरी घेवुन ते कोषागार विभागात जमा केले. या कामाचा मोबदला म्हणून सलिम अब्दुल अहमद शेख, वय ४५ वर्ष, पद वरिष्ठ लिपीक (गट क) पुर्णा पाटबंधारे विभाग वसमत यांनी तक्रारदार यांचेकडे १,०००/- रू. लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्वतः स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक २३.०३.२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे सलिम अब्दुल अहमद शेख यांनी त्यांचे कॅबीनमध्ये पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत येथे तक्रारदार यांच्याकडुन शासकिय पंचासमक्ष लाच रक्कम १,०००/- रूपये स्वतः स्विकारली असता त्यांना लाच रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचे विरूद्ध पोलीस स्टेशन वसमत शहर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. श्री अशोक कदम, अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नांदेड व श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती सुलभा राऊत, राजेश मलपिलु, पोह गजानन पवार, गोविंद शिंदे पोशि अमोल जाधव, विनोद पुंडगे चापोह शेख अकबर सर्व ॲन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी ॲन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा.श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.क्र. ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९

श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, मो.क्र. ९८२२२५९९३२

टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६-२२३०५५.

व्हॉटसअप क्रमांक ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.

कार्यालय पोलीस उप अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

( राजेश मलपिलु )
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.